भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंती वर्षानिमित्त १२५ निवडक गावांतील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा सर्वांगीण विकास करणे वाटेगांव, ता. वाळवा, जि. सांगली.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय, क्रमांक: दवसु-२०१९/प्र.क्र. ८१/अजाक
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २३ जुलै,२०१९.

वाचा :

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सान्यावि-२०१५/ प्र. क्र.१६३/ बांधकामे, दिनांक ०९ ऑक्टोबर,२०१५.
२. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक:दवसु-२०१६/प्र. क्र.१५६/ अजाक, दिनांक १२ ऑगस्ट,२०१६.
३. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: दवसु-२०१६/प्र. क्र.२२७/ अजाक, दिनांक २६ ऑक्टोबर,२०१६.
४. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र, क्रमांक: सकआ / मावक /अजानबौघवि / निअजानबौ / डॉबाआं१२५जयंती / २०१८ / का-१२ / १३५, दिनांक ०२ जानेवारी,२०१९.
५. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०१३/प्र. क्र.३००/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५.

प्रस्तावना:

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंती वर्षानिमित्त १२५ निवडक गावांतील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा सर्वांगिण विकास करण्याचा निर्णय शासनाने उपरोक्त वाचा २ अन्वये घेतलेला आहे. सदर निर्णयांतर्गत "वाटेगांव, ता. वाळवा, जि. सांगली" येथील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा समावेश उपरोक्त वाचा ३ अन्वये करण्यात आलेला आहे. यास अनुसरून वाटेगांव, ता. वाळवा, जि. सांगली येथील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा विकासाचा प्रस्ताव (अंदाजपत्रक) उप अभियंता (इ.व द.), वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर, जि. सांगली यांनी तयार केलेला असून कार्यकारी अभियंता (इ. व द.), जिल्हा परिषद, सांगली यांनी साक्षांकित केलेला आहे. सदर प्रस्ताव (अंदाजपत्रक) उपरोक्त वाचा ४ अन्वये आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव शासनाने मान्य केलेला असून आणि त्यातील, उपरोक्त वाचा ५ अन्वये वित्तीय अधिकारांतर्गत येणाऱ्या कामाच्या प्रस्तावापैकी प्रस्तावातील अनुक्रमांक १५ ते १८ व २२चे अंदाजपत्रके खालीलप्रमाणे आहेत:

अ.क्र.	प्रस्तावातील अनुक्रमांक	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम रुपये
१.	१५.	संभाजी जाधव ते अण्णा रामा जाधव यांचे घरापर्यंत पेव्हींग ब्लॉक बसविणे	८५,०७०
२.	१६.	बंडा रामा साठे ते अनिल साठे यांचे घरापर्यंत आर. सी. सी. गटार बांधणे	२,३०,६९१
३.	१७.	बौध्द विहाराशेजारी पेव्हींग ब्लॉक व सुशोभिकरण	१,८१,१६२
४.	१८.	महार पाणंद रस्ता खडीकरण, मुरमीकरण, डांबरीकरण व संरक्षक भिंत	११,३३,०१९
५.	२२.	कृष्णमुर्ती यांचे घर ते पुनवतकर यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व गटार बांधणे	३,४४,३९४
		एकूण	१९,७४,३३६
अक्षरी एकोणवीस लक्ष चौऱ्याहत्तर हजार तीनशे छत्तीस फक्त			

सदर प्रस्तावित कामांच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:</u>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंती वर्षानिमित्त १२५ निवडक गावांतील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा सर्वांगिण विकास करण्याच्या निर्णयास अनुसरुन आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वाटेगांव, ता. वाळवा, जि. सांगली येथील अनुसूचित जाती व नवबौध्द वस्ती विकासाच्या सादर केलेला उपरोक्त रुपये १९,७४,३३६/- (अक्षरी एकोणवीस लक्ष चौऱ्याहत्तर हजार तीनशे छत्तीस फक्त) च्या प्रस्तावास पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:

१. काम सुरु करण्यापूर्वी नमूना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच काम सुरु करण्यात यावे.

२. ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घेण्यात यावे.

३. प्रत्यक्ष काम करतेवेळी शासन निर्णय, पर्यावरण विभाग, क्रमांक: इएनव्ही-२०१३/प्र.क्र. १७७/तां.क.-१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक: बीडीजी-२०१७/ प्र.क्र. ६०/इमारती-२, दिनांक ०७ जुलै, २०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

५. प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यापूर्वी सदर अंदाजपत्रकास उपभोक्ता विभागाच्यावतीने सक्षम प्राधिकारी म्हणून प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे यांनी साक्षांकन करणे आवश्यक आहे.

६. नियोजित जागा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

७. सदर प्रकरणी शासन निर्णय, दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ मधील इतर अटी परिच्छेदातील अनुक्रमांक ६ नुसार सदर कामे सार्वजनिक बांधकाम विभाग/जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांच्यामार्फत करण्यात यावीत.

८. उपरोक्त कामे अनुसूचित जाती तथा नवबौध्द वस्तीतीलच आहेत याची प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे यांनी खात्री करावी.

९. निधी वितरणाच्या मार्गदर्शक सूचना समाज कल्याण आयुक्त स्तरावरुन देण्यात याव्यात.

२. सदर प्रकरणी होणारा खर्च हा

मागणी क्रमांक एन-३,

मुख्य लेखाशिर्ष २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण,

०१ अनुसूचित जातींचे कल्याण,

७८९, अनुसूचित जाती उपयोजना,

(०२) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५वी जयंती साजरी करणे,

(०२) (०१) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५वी जयंती साजरी करणे. (कार्यक्रम),

५३, मोठी बांधकामे,

लेखाशिर्ष २२२५ डी ८२३ या लेखाशीर्षाखाली खर्ची घालून तो सन २०१९-२० या वर्षात करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा. यासाठी आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय, वित्तीय अधिकाराचा शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उप विभाग पाच, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ अन्वये विभाग प्रमुखांस प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तीनुसार काढण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७२३१७४१४३९६२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil D Sardar

Digitally signed by Sunil D Sardar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0098eb68042c66b72115bc62ef9206ece42981aab126657128d7cadca447533, cn=Sunil D Sardar
Date: 2019.07.23 17:51:39 +05'30'

(सुनिल सरदार)
कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे.
३. कार्यकारी अभियंता (इ. व द.), जिल्हा परिषद, सांगली.
४. श्री. स.रा.पाटील, वास्तुशास्त्रज्ञ, उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांचे कार्यालय, पुणे.
५. उप अभियंता (इ. व द.), वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर, जि. सांगली.
६. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सांगली.
७. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.
८. गट विकास अधिकारी, वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर, जि. सांगली.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -१, महाराष्ट्र, मुंबई.
१०.महालेखापाल (लेखापरिक्षा) -१,महाराष्ट्र,मुंबई.
११.संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२.कक्ष अधिकारी (विनिमय / व्यय-१५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प/विघयो), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.निवड नस्ती /अजाक.